नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक ११/१०/२०२६ ( रविवार )

---

## आगामी सणोत्सवाच्या पार्श्वभूमीवर कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी नागपूर ग्रामीण पोलीसांचा रूट मार्च व दंगा नियंत्रणाची रंगीत तालीम

**मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा, श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनात दिनांक ११/१०/२०२६ रोजी नवरात्रोत्सव तसेच इतर सणोत्सवाच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी तसेच कोणत्याही अनुचित परिस्थितीचा प्रभावीपणे सामना करण्याच्या दृष्टीने नागपूर ग्रामीण जिल्हयात विविध पोलीस स्टेशन च्या हद्दीत रूट मार्च व दंगा नियंत्रणाची रंगीत तालीम घेण्यात आली. तसेच दहशतवादी अथवा आपत्कालीन परिस्थितीचा सामना करण्यासाठी अँटी टेरर ड्रिल (Anti&Terror Drill) आणि प्रत्यक्ष रेस्क्यू ऑपरेशनचे (Rescue Operation) प्रात्यक्षिक करून दाखवण्यात आले. यावेळी पोलीस अधिकारी व अंमलदार ढाल, लाठी, हेल्मेट इत्यादी साहित्याने सज्ज होऊन सराव करण्यात सहभागी झाले. तसेच पोलीस दलाची सज्जता, जलद प्रतिसाद क्षमता, पथकांमधील समन्वय तसेच उपलब्ध दंगा नियंत्रण साहित्याच्या हाताळणीचा सराव करण्यात आला.**

**पोलीस स्टेशन बोरी** :– श्री. मयंक माधव, सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, उमरेड विभाग (अतिरिक्त कार्यभार, नागपूर विभाग) यांच्या उपस्थितीत पोलीस निरीक्षक श्री निशांत मेश्राम प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन बोरी यांच्यासह बोरी पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदार, दंगा नियंत्रण पथक (RCP), जलद प्रतिसाद पथक (QRT) आणि होमगार्ड यांनी बोरी शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला. रूट मार्च पोलीस स्टेशन बुट्टीबोरी येथून सुरू होऊन प्रभाग क्रमांक ०१, रजा कुलर फॅब्रिकेशन, शिव अन्नपूर्णा मंदिर, दुर्गा मंदिर, नगरपरिषदेसमोरील परिसर, मा. कॉम्प्लेक्स चौक व बुटीबोरी मार्केट रोडमार्गे एमआयडीसी चौक, बुटीबोरी येथे पोहोचला. यानंतर एमआयडीसी चौक येथे दंगा नियंत्रण योजनेअंतर्गत मॉक ड्रिल घेण्यात आले.

**पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** :– सहा. पोलीस निरीक्षक श्री प्रशांत भोयर, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी यांच्या उपस्थितीत एमआयडीसी बोरी पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदार, दंगा नियत्रंण पथक (RCP), जलद प्रतिसाद पथक (QRT) आणि होमगार्ड यांनी एमआयडीसी बोरी शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला. सदर रूटमार्च हा छत्रपती शिवाजी महाराज चौक, खापरी चौक, मेन रोड टाकळघाट, अमर विद्यालय येथे रूट मार्च काढण्यात आला. तसेच बस स्टॉप टाकळघाट येथे दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन बेला** :– सहा. पोलीस निरीक्षक श्री उमेश नासरे प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन बेला यांच्यासह बेला पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदार, दंगा नियत्रंण (RCP), जलद प्रतिसाद पथक (QRT) आणि होमगार्ड यांनी बेला शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला. तसेच दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन मौदा** :– श्री शशांत एन. एम., सहा. पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी कन्हान विभाग यांचे उपस्थितीत सहा. पोलीस निरीक्षक श्री लसंते, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन मौदा यांच्यासह मौदा पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदार, दंगा नियत्रंण पथक (RCP), जलद प्रतिसाद पथक (QRT) आणि होमगार्ड यांनी मौदा शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला. तसेच दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन वडोदा** :– सहा. पोलीस निरीक्षक श्री मनोज गदादे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन वडोदा यांच्यासह वडोदा पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदार, दंगा नियत्रंण (RCP), जलद प्रतिसाद पथक (QRT) आणि होमगार्ड यांनी वडोदा येथील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला. तसेच दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन कन्हान** :– श्री शशांत एन. एम., सहा. पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी कन्हान विभाग यांचे उपस्थितीत पोलीस निरीक्षक श्रीमती वैजयंती मांडवधरे प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन कन्हान यांच्यासह कन्हान पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदार, दंगा नियत्रंण पथक (RCP), जलद प्रतिसाद पथक (QRT) आणि होमगार्ड यांनी कन्हान शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला. तसेच दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन सावनेर** :– श्री सागर खर्डे सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, सावनेर विभाग यांच्या उपस्थितीत पोलीस निरीक्षक श्रीमती ऋतुजा जाधव प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन सावनेर यांच्यासह सावनेर पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदार, दंगा नियत्रंण पथक (RCP), जलद प्रतिसाद पथक

(QRT) आणि होमगार्ड यांनी सावनेर शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला. तसेच दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन कळमेश्वर** :- श्री सागर खर्डे सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, सावनेर विभाग यांच्या उपस्थितीत पोलीस निरीक्षक श्री मनोज काळबांडे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन कळमेश्वर यांच्यासह कळमेश्वर पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदार, दंगा नियत्रंण पथक (RCP), जलद प्रतिसाद पथक (QRT) आणि होमगार्ड यांनी कळमेश्वर शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला. तसेच दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन खापा** :- पोलीस निरीक्षक श्री चंद्रकांत काळे प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन खापा यांच्यासह खापा पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदार, दंगा नियत्रंण पथक (RCP), जलद प्रतिसाद पथक (QRT) आणि होमगार्ड यांनी खापा शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला. तसेच दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन केळवद** :- सहा. पोलीस निरीक्षक श्री आशिष ठाकुर, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन केळवद यांच्यासह केळवद पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदार, दंगा नियत्रंण पथक (RCP), जलद प्रतिसाद पथक (QRT) आणि होमगार्ड यांनी केळवद शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला. तसेच दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन मोहपा** :- पोलीस निरीक्षक श्री ईश्वर हनवते, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन मोहपा यांच्यासह मोहपा पोलीस स्टेशन येथील अधिकारी आणि अंमलदार, दंगा नियत्रंण पथक (RCP), जलद प्रतिसाद पथक (QRT) आणि होमगार्ड यांनी मोहपा शहरातील प्रमुख रस्ते, बाजारपेठ, महत्त्वाची ठिकाणे व संवेदनशील परिसरातून रूट मार्च काढला. तसेच दंगा नियंत्रण योजनांचा सराव घेण्यात आला.

**आगामी सणोत्सव शांततेत, सुरक्षित व उत्साहपूर्ण वातावरणात पार पडावा, यासाठी नागपूर ग्रामीण पोलीस दल सज्ज असून, नागरिकांनीही सणोत्सव शांततेत साजरा करून कायदा व सुव्यवस्था अबाधित राखावी असे आवाहन नागपूर ग्रामीण पोलीसांकडून करण्यात आले आहे.**
















बस स्थानक टाकळघाट
POLICE





## आगामी सणोत्सवाच्या पार्श्वभूमीवर नागपूर ग्रामीण पोलीसांनी घेतल्या प्रशासकीय बैठका, शांतता समिती तसेच आयोजकांच्या बैठका

**मा. श्री हर्ष ए. पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक नागपुर ग्रामीण जिल्हा ,श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा नागपूर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात नवरात्रोत्सवाच्या तसेच विविध धार्मिक उत्सवांच्या पार्श्वभूमीवर सणोत्सव बंदोबस्त असल्याने कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी नागपूर ग्रामीण जिल्ह्यातील विविध पोलीस स्टेशन येथे आगामी सणोत्सवांच्या निमित्य विविध बैठका घेण्यात आल्या.**

पोलीस स्टेशन पारशिवनी :– **दिनांक १०/१०/२०२६ रोजी श्री. रमेश बरकते उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग** यांच्या अध्यक्षतेखाली नवरात्रोत्सव व इतर सण–उत्सवांच्या अनुषंगाने पारशिवनी येथील तालुका प्रशासनातील विविध विभागांच्या प्रमुखांची आढावा बैठक घेतली. सदर बैठकीस सहा. पोलीस निरीक्षक श्री किशोर शेरकी, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन पारशिवनी यांच्यासह सार्वजनिक बांधकाम विभागाचे उपविभागीय अभियंता श्री. किरण पोकळे, कनिष्ठ अभियंता श्री. प्रवीण लोखंडे, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीचे कनिष्ठ अभियंता श्री. मनीष शहारे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. आशीर्वाद नागपूरकर, नगरपंचायत पारशिवनीचे स्वच्छता निरीक्षक श्री. निलेश नकाशे, महसूल विभागाचे प्रतिनिधी तसेच विविध प्रशासकीय विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

बैठकीनंतर उपविभागीय पोलीस अधिकारी, ठाणेदार पारशिवनी आणि संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांनी दुर्गादेवी स्थापना स्थळे, विसर्जन मिरवणुकीचे मार्ग व विसर्जन स्थळांना प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी केली. यावेळी विविध विभागांमार्फत करण्यात येणाऱ्या उपाययोजनांचा आढावा घेण्यात आला तसेच आवश्यक त्या सुधारणा व कार्यवाहीबाबत संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देण्यात आल्या.

**पोलीस स्टेशन अरोली** :– दिनांक १०/१०/२०२६ रोजी श्री. रमेश बरकते उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक विभाग यांच्या मार्गदर्शनाखाली सहा पोलीस निरीक्षक श्री सागर गोमासे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन अरोली यांचे उपस्थितीत नवरात्रोत्सव व इतर सण–उत्सवांच्या अनुषंगाने पोलीस स्टेशन अरोली येथे विविध उत्सव मंडळांचे पदाधिकारी आणि शांतता समितीच्या सदस्यांची बैठक घेतली.

**पोलीस स्टेशन कोंढाळी** :– **दिनांक १०/१०/२०२६ रोजी** पोलीस निरीक्षक श्री सुमित परतेकी, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन कोंढाळी यांनी नवरात्रोत्सव तसेच इतर सण उत्सवांच्या अनुषंगाने कोंढाळी पोलीस ठाणे हद्दीतील शांतता समितीच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली. सदर बैठकीस पोलीस स्टेशन कोंढाळीच्या हद्दीतील शांतता समितीचे पदाधिकारी उपस्थित होते.

**पोलीस स्टेशन खापा** :– **दिनांक १०/१०/२०२६ रोजी** पोलीस निरीक्षक श्री चंद्रकांत काळे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन खापा यांनी नवरात्रोत्सव व इतर सण उत्सवांच्या अनुषंगाने खापा पोलीस ठाण्यात शांतता समितीच्या पदाधिकाऱ्यांची बैठक घेण्यात आली.

**पोलीस स्टेशन कन्हान** :– **दिनांक १०/१०/२०२६ रोजी** पोलीस निरीक्षक श्रीमती वैजयंती मांडवधरे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन कन्हान यांनी नवरात्रोत्सव अनुषंगाने शांतता समिती सदस्य व डीजे चालकांची बैठक घेतली.

**नवरात्रोत्सव शांततेत व उत्साहपूर्ण वातावरणात पार पाडण्यासाठी नागरिकांनी तसेच उत्सव मंडळांनी पोलीस प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले. दुर्गा उत्सवाच्या अनुषंगाने दुर्गादेवी मंडळांना नियमानुसार आवश्यक परवानगी घेणे, डीजे व ध्वनी प्रदूषणाबाबत मा. सर्वोच्च न्यायालयाने निर्धारित केलेल्या नियमांचे काटेकोरपणे पालन करावे, तसेच जातीय सलोखा राखुन सणोत्सव साजरा करावे असे अवाहन करण्यात आले. यावेळी आयोजकांच्या अडचणी व समस्या जाणून घेण्यात आल्या असून, त्यांचे आवश्यकतेनुसार संबंधित विभागांच्या समन्वयाने निराकरण करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.**















## सायबर सुरक्षा जनजागृती महिना – ऑक्टोबर २०२६ अंतर्गत नागपुर ग्रामीण जिल्हयात राबविण्यात येत आहे सायबर सुरक्षा जनजागृती मोहीम

नागपुर ग्रामीण जिल्हयात **सायबर सुरक्षा जनजागृती महिना – ऑक्टोबर २०२६ अंतर्गत** मा. श्री. हर्ष ए पोद्दार, वरीष्ठ पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण जिल्हा आणि श्री अनिल म्हस्के, अपर पोलीस अधिक्षक, नागपुर ग्रामीण यांच्या मार्गदर्शनात सायबर सुरक्षा जनजागृती मोहीमेअंतर्गत दिनांक १०/१०/२०२६ रोजी पोलीस स्टेशन नरखेड येथे खालील प्रमाणे सायबर सुरक्षा जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला.

**पोलीस स्टेशन नरखेड** :– सहा. पोलीस निरीक्षक श्रीमती मंगला मोकाशे, प्रभारी अधिकारी, पोलीस स्टेशन नरखेड यांनी येनिकोणी येथील ग्रामपंचायत कार्यालयात सायबर जनजागृती कार्यक्रम घेतला. सदर कार्यक्रमास महिला बचत गटातील सदस्य महिला तसेच पुरूष उपस्थित होते.

**सदर कार्यक्रमामध्ये सायबर जनजागृती व्हिडीओ दाखविण्यात आले. सायबर गुन्ह्यांचे विविध प्रकार, बनावट सोशल मीडिया प्रोफाईल, आर्थिक फसवणूक, फसवे कॉल व संदेश यापासून बचाव करण्याबाबत मार्गदर्शन करण्यात आले. अनोळखी लिंक, ओटीपी, बनावट नोकरीच्या जाहिराती पासून सावध राहण्याबाबत मार्गदर्शन केले.**

मॉर्फिंग ,फिशींग, डिजिटल अरेस्ट, ट्रेडींग फसवणुक , तसेच डिजिटल व्यवहारांमध्ये घ्यावयाची काळजी याबाबत सविस्तर माहीती देवुन सायबर जनजागृती करण्यात आली. फसवणूक झाल्यास तात्काळ 'सायबर हेल्पलाईन १९३० वर संपर्क साधावा किंवा **cybercrime.gov.in** या संकेतस्थळावर तक्रार नोंदवावी, असे आवाहन करण्यात आले.

नागरिकांनी डिजिटल व्यवहार करताना सतर्कता बाळगावी, कोणत्याही अनोळखी व्यक्तीस वैयक्तिक अथवा बँकिंग माहिती देऊ नये आणि सायबर फसवणूक झाल्यास विलंब न  हेल्पलाईन क्रमांकावर तक्रार नोंदवावी, असे आवाहन नागपूर ग्रामीण पोलीसांकडून करण्यात आले आहे.






## पोलीस स्टेशन जलालखेडा अंतर्गत अवैध दारू विरुद्ध ०५ गुन्हे नोंद

पोलीस स्टेशन जलालखेडा :— दि. १०/१०/२०२६ रोजी अवैध दारूविक्री व मोहफुलाच्या दारूच्या साठ्याविरोधात जलालखेडा पोलिसांनी बानोरचंद, मालटेकडी आणि उमठा येथे धडक कारवाई करत एकूण पाच गुन्हे दाखल केले. या कारवाईदरम्यान विदेशी व देशी दारू, मोहफुलाची दारू तसेच दारू तयार करण्यासाठी वापरण्यात येणारे साहित्य असा एकूण ५०,३००/— रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

आरोपी १. विजयसिंग जतनसिंग भोंड, वय ५५ वर्ष, रा. बानोरचंद्र शिख बेडा , ता. नरखेड २. चंन्दु सुरेन्द्र पवार, वय २७ वर्ष, रा. मालटेकडी ता. नरखेड व ०३ महिला आरोपी यांचेवर कारवाई करत घटनास्थळावरून कारवाईत पोलीसांनी घटनास्थळावरून पंचासमक्ष देशी दारूच्या २८ निपा, विदेशी दारूच्या ०९ निपा, एकुण ४७० लिटर मोहाफुल गावठी दारू, प्लास्टीक आणि लोखंडी ड्रम ,जळाउ लाकुड, पाईप तसेच दारू गाळण्याचे इतर साहीत्य असा एकुण ५०,३००/— रूपयांचा माल जप्त केला. नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला. नमुद आरोपी विरुद्ध महाराष्ट्र दारूबंदी अधिनियमान्वये ०५ गुन्हे नोंदविण्यात आले आहे.



## अवैध दारू निर्मिती, विक्री आणि सेवन करणाऱ्यांवर १० गुन्हे दाखल,

**दिनांक १०/१०/२०२६ रोजी मा. श्री. हर्ष पोद्दार, वरिष्ठ पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा व श्री. अनिल मस्के, अपर पोलीस अधीक्षक, नागपूर ग्रामीण जिल्हा यांच्या मार्गदर्शनाखाली अवैध दारूची निर्मिती, विक्री, साठवणूक तसेच दारूचे सेवन करणाऱ्या व्यक्तींविरुद्ध प्रभावी कारवाई करून दारूबंदी कायद्यान्वये एकूण १० गुन्हे दाखल केले.**

**पोलीस स्टेशन एमआयडीसी बोरी** येथे महिला आरोपी हिचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन बेला** येथे आरोपी नामे प्रितम हरिदास सुटे, वय २० वर्ष, रा. सिर्सी, ता. उमरेड, जि. नागपुर याचेवर ०१ गुन्हा नोंद, **पोलीस स्टेशन जलालखेडा** येथे आरोपी नामे १. विजयसिंग जतनसिंग भोंड, वय ५५ वर्ष, रा. बानोरचंद्र शिख बेडा , ता. नरखेड २. चंन्दु सुरेन्द्र पवार, वय २७ वर्ष, रा. मालटेकडी ता. नरखेड व ०३ महिला आरोपी यांचेवर प्रत्येकी ०१ गुन्हा असे ०५ गुन्हे नोंद, **पोलीस स्टेशन काटोल** येथे आरोपी नामे जयपाल लिलाधर वाहाने, रा. रिधोरा, ता. काटोल, जि. नागपुर याचेवर ०१ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन उमरेड** येथे आरोपी नामे विक्की किसन सहारे, वय २६ वर्ष, रा. आपतुर याचेवर ०१ गुन्हा नोंद. **पोलीस स्टेशन वडोदा** येथे आरोपी नामे अर्जुन नथ्थुजी चन्ने, वय ५३ वर्षे, रा. वडोदा, ता. कामठी, जि. नागपुर याचेवर ०१ गुन्हा नोंद.

**नमुद कारवाईत एकुण ४४१० मिली देशी दारू, १६६० मिली विदेशी दारू, ७० लीटर मोहाफुल दारू, २०० लीटर मोहाफुल सडवा, दारू गाळण्याचे साहीत्य असा एकुण ५१,४२०/― रूपयांचा मुद्देमाल मिळून आल्याने नाशवंत मुद्देमाल मौक्यावर पंचनामा कार्यवाही करून नष्ट करण्यात आला.**

जनसंपर्क अधिकारी
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर